देशोन्नती

# राधाबाई गणगणे कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सिक्युरीटीबाबत मार्गदर्शन



**मुंडगाव :** येथील राधाबाई गणगणे कनिष्ठ महाविद्यालयात नुकताच सायबर सिक्युरीटीबाबत मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला. यावेळी अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे सुमित सपकाळ, अनिकेत भुडके या विद्यार्थ्यांनी सायबर क्राइम, ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडियाचा वाढता वापर, त्यामधून होणारी फसवणूक, आपण करीत असलेली ऑनलाइन खरेदी या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच मोबाइलमध्ये येणारे नवनवीन ॲप, फसव्या लिंकपासून दूर राहण्याचे आवाहनही करण्यात आले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक चंद्रशेखर अंबळकार, पर्यवेक्षक बाळासाहेब काटे, शिक्षकवृंद अनिल गवई, माणिक राठोड, देवेंद्र सोनटक्के, राजेंद्र मुर्हेकार, डिगांबर घुगे, आनंद चंदनकार, निलेश देशमुख, हेमंत गणगणे, बिपीन नावकर, मिलिंद शेलकर, सुदर्शा पाटकर, गीता वलवले, सुवर्णा येवतकार, स्वाती मडघे, अनिता कोडापे, प्रवीण अंबळकार व वर्ग आठवी ते बारावीपर्यंतचे विद्यार्थी व शाळेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.